# नि.फौ.ख.क्र.६९/२०१३ अर्ज निशाणी ५४ खालील आदेश

(CNR MHNS160006962013)

०१. अर्ज व त्यावरील जबाब वाचला. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रस्तुतच्या अर्जान्वये आरोपींनी फिर्यादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यास विनंती केलेली आहे. संचिकेचे अवलोकन केले असता, फिर्यादी यशवंत यांचा पुरावा दिनांक २९.०१.२०२१ रोजी नोंदविण्यात आला. सदर दिवशी आरोपीचे विधीज्ञ हे वेळोवेळी पुकारा करुन देखील उलटतपास घेण्यासाठी हजर झाले नाही. आरोपींनी स्वतः उलटतपास घेण्याचे नाकारल्याचे दिसते. त्यामुळे, साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये सदर दिवशी उलटतपास का घेतला नाही याबाबत कोणतेही संयुक्तिक कारण नमुद केलेले नाही. परंतु, गुन्हयाचे स्वरुप बघता, आरोपींना उलटतपासाची संधी देणे न्यायोचीत वाटते. परंतु, संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळाच्या अनुषंगाने खर्च देणे देखील गरजेचे आहे. करिता खालील आदेश.

**– आदेश –**

१. अर्ज निशाणी क्र.५४ मंजूर करण्यात येतो.

२. आरोपींनी खर्च म्हणून रू.५००/–(रूपये पाचशे फक्त) फिर्यादीला द्यावे.

दिनांक – ०७.१०.२०२१

(सुनिल बा. वाळके)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चांदवड.

## **<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : प्र. प्र. भडके

न्यायालयाचे नांव : प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय चांदवड

दिनांक : ०७.१०.२०२१.